अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ

सायं.दैनिक महाराष्ट्र

# आरंभ

MO.9860898564

संपादक - दिपक थोरात

## विकसित भारत संकल्प यात्रा अभियान जनआंदोलनाद्वारे यशस्वी करावे - प्रधानमंत्री नरेंद्र मोदी



मुंबई : विकसित भारत संकल्प यात्रेत नागरिकांनी सहभागी होऊन याला जन आंदोलनाचे रुप द्यावे. समाजातील शेवटच्या घटकापर्यंत शासनाच्या योजना पोहोचविण्यासाठी संकल्प यात्रा सुरू करण्यात आली आहे. महिला, युवा, शेतकरी आणि गरीब हे समाजातील अमृतस्तंभ असून, यांचा विकास हाच शासनाचा ध्यास आहे. या चार वर्गाच्या विकासाद्वारे भारताचा विकास साधण्यासाठी नागरिकांनी सहभाग नोंदवून 'विकसित भारत संकल्प यात्रा अभियान' यशस्वी करण्याचे आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केले.

आज विकसित भारत सकंल्प यात्रेअंतर्गत सहभागी झारखंड, अरुणाचल प्रदेश, जम्मू काश्मीर, ओडिशा, आंध्र प्रदेश या राज्यातील लाभार्थ्यांसोबत प्रधानमंत्री श्री. मोदी यांनी दूरदृश्यसंवाद प्रणालीद्वारे संवाद साधला.

बीड (महाराष्ट्र) सायं.दैनिक मराठी वर्ष -०१ अंक -७१ गुरूवार दि.३० नोव्हेंबर २०२३ आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ किंमत ३ रू । पाने ४

Beed (Maharashtra) Daily Evening MARATHI Year-01 Issue -71 THURSDAY DT.30 NOVEMBER 2023 RNI : MAHMAR/2023/83965 PRICE - 3 RUPEES PAGES - 4

# अवकाळीग्रस्त भागाला सर्व पालकमंत्री भेट देणार

## सर्व जिल्ह्यांचे पंचनाम्यांचे प्रस्ताव एकत्रित सादर करा शेतकर्यांना नुकसानभरपाई देणार- मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

गेल्या दोन दिवसांत राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये अवकाळी पाऊस, गारपीट यामुळे शेती आणि फळ पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून सुमारे १ लाख हेक्टर क्षेत्र बाधित झाले आहे. शेतकर्यांना वार्यावर सोडणार नसून ३ हेक्टरपर्यंत नुकसान भरपाई देण्यात येईल. यासाठी महसूल, कृषी विभागाने तातडीने कालबध्द रितीने एकत्रितरित्या सर्व जिल्ह्यांचे पंचनामे पूर्ण करावेत, असे निर्देश आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्य मंत्रिमंडळ बैठकीत दिले. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी देखील यासंदर्भात प्रशासनाने युद्ध स्तरावर काम करावे, अशा सूचना दिल्या.

आज मदत व पुनर्वसन तसेच कृषी विभागाने राज्यात पडलेल्या अवकाळी पाऊस आणि गारपीट याबाबत सादरीकरण केले. पंचनामे प्रचलित कार्यपद्धतीप्रमाणे तातडीने करण्याचे आदेश सर्व जिल्हाधिकारी यांनी सर्व क्षेत्रीय यंत्रणांना द्यावेत व ३३ टक्क्यांपेक्षा जास्त शेती पिकांचे नुकसान झालेल्या प्रकरणी निधी मागणीचा प्रस्ताव तत्काळ शासनाकडे पाठविण्याची व्यवस्था करावी, असे औपचारिक निर्देश महसूल व वन (आपत्ती व्यवस्थापन) विभागाने सर्व जिल्हाधिकारी यांना कालच दिल्याची मंत्रिमंडळाने नोंद घेतली. राज्यातील बाधित शेतकर्यांना लवकरात लवकर मदत देण्याकरिता निधी मागणीचे प्रस्ताव सर्व जिल्हाधिकारी यांच्याकडून प्राप्त करून घेऊन निधी वितरित करण्याचे एकत्रित प्रस्तावावर विभागाने तातडीने निर्णय घेण्याचे निर्देश मंत्रिमंडळाने यावेळी दिले.ठाणे जिल्ह्यातील शहापूर, मुरबाड हे तालुके बाधित असून यातील ५३ हेक्टर क्षेत्रातील भाजीपाल्याचे नुकसान झाले आहे., पालघर जिल्ह्यातील पालघर, वसई व डहाणू तालुक्यातील ४१ हेक्टर क्षेत्रातील भाजीपाल्याचे नुकसान झाले आहे, नाशिक जिल्ह्यातील कळवण, नांदगाव, नाशिक, निफाड, त्र्यंबकेश्वर, सटाणा, दिंडोरी, पेठ, सुरगाणा, इगतपुरी, सिन्नर, चांदवड, येवला तालुक्यातील ३२ हजार ८३३ हेक्टर क्षेत्रातील कांदा, द्राक्ष, सोयाबीन, मका, गहू, ऊस व फळपिके, धुळे जिल्ह्यातील साक्री, शिरपूर, शिंदखेडा तालुक्यातील ४६ हेक्टर क्षेत्रातील केळी, पपई, कापूस, हरभरा, नंदुरबार जिल्ह्यातील नवापूर, अक्कलकुवा, नंदुरबार, शहादा, तळोदा, अक्राणी तालुक्यातील २ हजार २३९ हेक्टर क्षेत्रातील भात, कापूस, तूर, मिरची, मका, कांदा पिकांचे, जळगाव जिल्ह्यातील जळगाव, भुसावळ, यावल, रावेर, मुक्ताईनगर, अमळनेर, चोपडा, एरंडोल, पारोळा, चाळीसगाव, जामनेर, पाचोरा, धरणगाव, बोदवड, भडगाव तालुक्यातील ५५२ हेक्टर क्षेत्रातील कांदा, हरभरा, गहू, मका, ज्वारी व फळ पिकांचे नुकसान झाले.अहमदनगर जिल्ह्यातील संगमनेर, अकोले, कोपरगाव, पारनेर, राहाता येथील १५ हजार ३०७ हेक्टर क्षेत्रातील केळी, पपई, मक्याचे नुकसान झाले आहे. पुणे जिल्ह्यातील खेड, आंबेगाव, शिरुर तालुक्यातील ३ हजार ५०० हेक्टर क्षेत्रातील द्राक्ष, कांदा पिकांचे नुकसान झाले आहे, सातारा जिल्ह्यातील जावळी तालुक्यातील १५ हेक्टर क्षेत्रातील भात पिकाचे नुकसान झाले आहे., छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील संभाजीनगर, पैठण, गंगापूर, वैजापूर, कन्नड, खुलताबाद, सिल्लोड, सोयगाव आणि फुलंब्री तालुक्यातील ४ हजार २०० हेक्टर क्षेत्रातील केळी, पपई व मका पिकांचे नुकसान झाले आहे,

जालना जिल्ह्यातील बदनापूर, जालना, जाफराबाद तालुक्यातील ५ हजार २७९ हेक्टर क्षेत्रातील द्राक्ष, केळी, कांदा, खरीप ज्वारी, गहू व हरभरा पिकांचे नुकसान झाले आहे. बीड जिल्ह्यातील परळी, बीड तालुक्यातील २१५ हेक्टर क्षेत्रातील कांदा, ज्वारी, भाजीपाल्याचे नुकसान झाले आहे, हिंगोली जिल्ह्यातील वसमत तालुक्यातील १०० हेक्टर क्षेत्रातील भाजीपाल्याचे नुकसान झाले आहे. परभणी जिल्ह्यातील परभणी, गंगाखेड, जिंतूर, पाथरी, पूर्णा, पालम मानवत सोनपेठ, सेलू तालुक्यातील १ हजार हेक्टर क्षेत्रातील रब्बी ज्वारी, कापूस, सीताफळ, पेरू, भाजीपाला या पिकांचे नुकसान झाले आहे, नांदेड जिल्ह्यातील नांदेड, मुदखेड तालुक्यातील ५० हेक्टर क्षेत्रातील केळी पिकाचे नुकसान झाले आहे, बुलढाणा जिल्ह्यातील बुलडाणा, नांदुरा, लोणार, सिंदखेडराजा, देऊळगाव राजा, संग्रामपूर, मेहकर, जळगाव जामोद, मलकापूर, खामगाव, शेगाव, मोताळा, नांदुरा तालुक्यातील ३३ हजार ९५१ हेक्टर क्षेत्रातील भाजीपाल्याचे नुकसान झाले आहे.

# शासन आपल्या दारी कार्यक्रमाच्या तयारीला परळीत वेग

परळी (प्रतिनिधी): राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत परळी येथे शासन आपल्यादारी कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. याची स्थानिक व जिल्हा प्रशासनाच्या वतीने जोरदार तयारी करण्यात येत आहे. दोन डिसेंबर रोजी हा कार्यक्रम होण्याची शक्यता आहे.

महायुती सरकारच्या वतीने सत्तेवर आल्यानंतर प्रत्येक जिल्ह्यात शासन आपल्या दारी उपक्रम मुख्यमंत्री ना.एकनाथ शिंदे, दोन्ही उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजीतदादा पवार व कृषीमंत्री ना.धनंजय मुंडे यांच्या उपस्थित घेण्यात येत आहे. बीड जिल्ह्याचा कार्यक्रम वैद्यनाथ महाविद्यालयच्या समोरील मैदानावर होणार आहे. आजपर्यंत अनेक वेळा या



कार्यक्रमाच्या तारखा घोषित करण्यात आल्या मात्र कोणत्या न कोणत्या कारणांनी त्या पुढे पुढे ढकलण्यात आल्या. आता मात्र या कार्यक्रमाची मैदानाची साफसफाई करुन मंडप, स्टेज उभारण्याची तयारी सुरू आहे. आंबेजोगाई परळी रस्त्यावर सिंचन भवन पासुन ईटके कॉर्नर पर्यंत स्वागत कमानी, वैद्यनाथ मंदिराकडे जाणार्या रस्त्याची रंगरंगोटी सुरू करण्यात आली आहे. यामुळे कार्यक्रम लवकर म्हणजे शुभारंभ ५ डिसेंबर होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

# अर्धा पक्ष ज्यांच्यामुळे फुटला ते विचारतात अजित पवारांनी राष्ट्रवादीसाठी काय केलं?

मुंबई : अजित पवार म्हणजे शब्दाला जागणारा नेता, २०१४ ला निवडणूक हरल्यानंतर माझी लायकी न बघता विधानपरीषदेची संधी दिली. पण ज्यांच्यामुळे अर्धा पक्ष फुटला ते आता विचारतात की अजित पवार यांनी पक्षासाठी काय केलं? असं म्हणत धनंजय मुंडे यांनी शरद पवार गटाच्या जितेंद्र आव्हाड यांच्यावर निशाणा साधला. तसेच सांगलीत राहून आरआर आबांना कुणी कसा त्रास दिला हे सर्वांनाच माहिती आहे असंही ते म्हणाले. अजित पवार गटाच्या पक्षाच्या कार्यक्रमात ते बोलत होते.

धनंजय मुंडे म्हणाले की, शब्दाला जागणारा आणि तो शब्द पाळण्यासाठी जगणारा नेता एकच आहे आणि तो म्हणजे अजित पवार. काही जणांना वाटतं अजित पवार यांनी लगेच मागणी पूर्ण करावी, परंतु ते शक्य नाही. त्यांनी जर शब्द दिला तर तो पाळल्याशिवाय राहत नाहीत. अजित पवारांनी अनेकांना अनेक जबाबदाऱ्या दिल्या, २०१४ ला निवडणूक हरल्यानंतर माझी लायकी न बघता विधानपरीषदेची संधी दिली. अजित पवार यांनी मला पक्षत घेतलं नसतं तर परळी विधानसभा मतदारसंघ आपण जिंकला असता का?



जितेंद्र आव्हाड यांच्यावर निशाणा

निरंजन डावखरे, गणेश नाईक यांना कुणाला कंटाळून पक्ष सोडावं लागला याच उत्तर द्या असं म्हणत धनंजय मुंडे यांनी शरद पवार गटाच्या जितेंद्र आव्हाड यांच्यावर निशाणा साधला आहे. अजित पवार यांनी जे काम केलं ते कधी सांगत नाही. ज्यांच्यामुळे अर्धा पक्ष फुटून गेला तो विचारतो अजित पवारांनी पक्षासाठी काय केलं? असाही टोला त्यांनी लगावला.

स्वर्गीय आबा जिवंत असते तर त्यांनी सांगितलं असतं की, सांगलीत राहून सांगलीतच कुणी कसा त्रास दिला असं म्हणत धनंजय मुंडे यांनी जयंत पाटील यांना टोला लगावला. सुनिल शेळके यांना पक्षात घेण्यापूर्वी तिकीट जाहीर झालं, ते कुणी केलं? असाही त्यांनी प्रश्न विचारला. त्यावेळी सामाजिक न्यायाची जबाबदारी मला कुणी दिली माहिती नाही, पण मला वाटतं त्यावेळी अजित पवार यांच्या हातात तो निर्णय नसावा असंही मुंडे म्हणाले.

# सध्याचे राजकारण म्हणजे कबड्डीचा खेळ झाला आहे; प्रीतम मुंडे स्पष्टच बोलल्या

बीड : खेळामध्ये राजकारण यायला नको पाहिजे असे सर्वजण म्हणतात, मात्र सध्याची परिस्थिती पाहता राजकारणामध्ये सर्व खेळ आले आहेत. आत्ताच राजकारण म्हणजे कबड्डीच्या खेळासारखा झाला असल्याचे वक्तव्य भाजप खासदार प्रीतम मुंडे यांनी केले आहे. बीड जिल्ह्यातील आष्टी येथे आमदार सुरेश धस यांच्या वतीने राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. याच स्पर्धेचे उद्घाटन करण्यासाठी प्रीतम मुंडे आष्टी येथे आल्या होत्या. यावेळी कबड्डी स्पर्धेचे उद्घाटन झाल्यानंतर प्रीतम मुंडे यांनी आपल्या भाषणातून राजकारणात कशा प्रकारचे खेळ सुरू आहे यावर भाष्य केले आहे. तर, दुसरीकडे बीड जिल्ह्यातले अनेक खेळाडू हे वेगवेगळ्या खेळांमध्ये आपल्या देशाचे प्रतिनिधित्व करत आहेत. त्यामुळे जिल्ह्यात अशा स्पर्धांचे आयोजन करून नवीन खेळाडू तयार झाले पाहिजेत अशी प्रतिक्रिया देखील प्रीतम मुंडे यांनी दिली.



त्या आष्टी येथे आयोजित कब्बडी स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होत्या या वेळी आ. सुरेश धस, माजी आ. भीमराव धोंडे यांच्यासह आदी मान्यवर उपस्थित होते. मागील काही दिवसांपासून राज्याच्या राजकारणात अनेक अनपेक्षित घटना घडतायत. राजकीय टीका करण्याची पातळी घसरली, कोण कोणत्या पक्षात कधी जाईल याची शाश्वती नाही. दरम्यान, या सर्व परिस्थितीवर भाजप खासदार प्रीतम मुंडे यांनी आपली भूमिका मांडली आहे. राज्यातील सध्याचे राजकारण म्हणजे कबड्डीच्या खेळासारखा झाला असल्याचे मुंडे या म्हणाल्या आहेत. एवढंच नाही तर खेळामध्ये राजकारण यायला नको पाहिजे असे सर्वजण म्हणतात, मात्र सध्याची परिस्थिती पाहता राजकारणामध्ये सर्व खेळ आले आहेत, असेही मुंडे म्हणाल्या आहेत.

मागील काही दिवसांपासून प्रीतम मुंडे यांचे बीड जिल्ह्यातील दौरे वाढले आहेत. आष्टी तालुक्यात पार पडलेल्या दिव्यांग पूर्व तपासणी शिबिरातील पात्र लाभार्थ्यांना पंचायत समिती कार्यालयच्या परिसरात नि:शुल्क सहाय्यक साधनांचे वाटप करण्यात आले.



सनी बबन चादणे यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा..

सायं दैनिक महाराष्ट्र आरंभ तर्फे

# भाऊची तेलंगाणात हवा!

## रोड शो, प्रचारक म्हणून बजावली तेलंगाणात महत्वपुर्ण भुमिका

## पक्षप्रमुख खा.ओवेंसींनी घेतली ॲड.शफिक भाऊंच्या पक्षनिष्ठेची दखल

बीड ।प्रतिनिधी

पाच राज्यांच्या निवडणुकीचा निकाल येत्या ३ डिसेंबर रोजी लागणार आहे, मिनी लोकसभेसाठी लोकांचा कौल कोणाकडे याकडे अवघ्या देशांचे लक्ष लागलेले आहे. यात प्रामुख्याने महाराष्ट्राच्या सीमेला लागुन असलेल्या तेलगाणा राज्याच्या निवडणुकीकडे जास्त लक्ष लागलेले आहे. कारण याच राज्यातील दोन पक्ष महाराष्ट्राच्या राजकारणाला वेगळे वळण देत आहेत. यात प्रामुख्याने बीआरएस आणि एमआयएम. या दोन्ही पक्षांमुळे महाराष्ट्रातील स्थानिक पक्ष चिंताग्रस्त झालेले आहेत. मुस्लिम समाजाचा आतापर्यंत ज्या पक्षांनी केवळ वोटबँक म्हणून वापर केला या पक्षातील नेत्यांना नेहमीच दुय्यम वागणुक मिळाली अशा नेत्यांना एमआयएमच्या रूपाने एक हक्काचे व्यासपीठ उभारले आहे. यामध्ये बीड जिल्ह्यात एमआयएम पक्षाने आपली पाळेमुळे चांगलीच रोवली असुन विद्यमान जिल्हाध्यक्ष ॲड.शेख शफिक भाऊ यांच्या झंझावती आणि संघटन कौशल्यामुळे एमआयएम बीड जिल्हयात सुस्थितीत आहे. ॲड.शेख शफिक भाऊ यांनी युवकांची प्रचंड मोठी फळी उभारली असुन या माध्यमातुन सामाजिक, शैक्षणिक, राजकीय क्षेत्रात कार्य करणे निरंतरपणे चालु आहे. आपल्याकडे असलेल्या अफाट भाषण कौशल्य आणि मराठी, हिंदी भाषेवर असलेले प्रभुत्व त्यांनी वेळोवेळी सिध्द केले आहे. याचाच फायदा त्यांना होतांना दिसत आहे. आपल्या भाषण कौशल्याच्या जोरावर हजारोंच्या जनसमुदायाला आपलेसे करण्याची ताकद भाऊमध्ये आहे.

याबाबत असे की, आपल्या भाषण कौशल्याची छाप जवळपास महाराष्ट्रात ॲड.शेख शफिक भाऊंनी निर्माण केली आहे. याचाच कौल म्हणावे की, काय त्यांना तेलंगाणामध्ये विधानसभा निवडणुकीसाठी एमआयएम पक्षाच्या उमेदवारांच्या प्रचाराला महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष खा.इम्तियाज जलील, कार्याध्यक्ष-गफ्फार कादरी, मराठवाडा अध्यक्ष फराज लाला, प्रदेश उपाध्यक्ष-सय्यद मोईन यांच्या सुचनेवरून बोलावणे आले. भाऊकडे असलेल्या भाषण कौशल्याची भुरळ एमआयएम पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष बॅरिस्टर खा.असदोद्दीन ओवेसी, अकबर ओवेसी यांच्यावर देखील आहे. ॲड.शेख शफिक भाऊंनी आपल्या पक्षाचे तेलंगाणा(हैदराबाद) राज्यातील जुबली हिल्स येथील एमआयएमचे उमेदवार मोहम्मद राशेद फराज यांच्या प्रचारार्थ सभा घेतल्या, मतदारांच्या भेटी गाठी घेवून उमेदवार कसा योग्य आहे हे पटवुन दिले, कॉर्नर बैठकांना उपिस्थिती दर्शवली, महत्वाच्या बैठका घेतल्या, प्रचार रॅली, रोड शो, सभेत हिरारीने सहभाग घेतला. तब्बल पाच दिवस आपल्या पक्षाचा उमेदवार विजयी व्हावा यासाठी अहोरात्र मेहनत करून पक्ष वाढीसाठी झटणारा नेता म्हणून महाराष्ट्रातच नव्हे तर तेलंगाणात देखील आपली छाप पाडली. आज तेलंगाणात निवडणुका होत आहेत तर याचा निकाल येत्या ३ डिसेंबर रोजी लागणार आहे. निकाल काहीही लागो पण ॲड.शेख शफिक भाऊंची पक्षाबाबत असलेली तळमळ आणि पक्षनिष्ठेचा निकाल आजच लागला हे मात्र निश्चीत!




### एमआयएम पक्षप्रमुख खा.ओवैसीकडून मिळाली कौतुकाची थाप

महाराष्ट्रातील विविध निवडणुकीत बुलंद आवाजाने सभा गाजवणाऱ्या एडवोकेट शेख शफीक भाऊ यांना प्रचारकरिता पक्षप्रमुखांनी तेलंगणातील निवडणुकांसाठी बोलाविले यातच भाऊंच्या कार्याची पावती मिळाली. संघटन कौशल्याच्या जोरावर केवळ स्थानिकच नव्हे तर राज्याचे देखील नेतृत्व करण्याची धमक त्यांच्यात असल्याचे दिसून येते समाजातील वंचित घटकांसाठी निस्वार्थपणे काम करीत राहणे यातच त्यांच्या मनाचा मोठेपणा दिसून येतो.

# प्रशासनाने शेतकऱ्याच्या आक्रोश मोर्चाची दखल न घेतल्यास तालुक्यात चक्काजाम करणार - अविनाश मोरे

अंबाजोगाई ।प्रतिनिधी

महाराष्ट्राचे कृषिमंत्री व बीड जिल्ह्याचे पालकमंत्री नामदार धनंजय मुंडे असतानाही परळी आंबेजोगाई तालुक्यातील हजारो शेतकरी बांधवांना सत्ताधारी पक्षाचे बर्दापूर जिल्हा परिषद माझी सदस्य अविनाश मोरे यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांना पिक विमा,दुष्काळ ,व कर्जमाफी यासह इतर मागण्यासाठी अंबाजोगाई उपजिल्हाधिकारी कार्यालयावर शेतकऱ्याचा

आक्रोश मोर्चा काढण्यात आला होता शेतकऱ्याच्या या गंभीर प्रश्नाची प्रशासनाने दक्कल येत्या ११ तारखेपर्यंत न घेतल्यास पंधरा डिसेंबर रोजी अंबाजोगाई तालुक्यात ठीक ठिकाणी रास्ता रोको आंदोलन करून चक्काजाम करण्याचा इशारा यावेळी देण्यात आला

अंबाजोगाईत शेतकऱ्याचा आक्रोश मोर्चा निघणार म्हणून यापूर्वीच प्रशासनाला लेखी कळवले होते व या शेतकरी मोर्चात शेतकऱ्यांनी कमी संख्या उपस्थित रहावे म्हणून अंबाजोगाई तालुक्यातील तालुका प्रशासनाच्या वतीने प्रत्येक गावातील ग्रामसभा घेण्याचे आदेश असल्याने अनेक गावात ग्रामसभा पार पडल्या असे असतानाही अनेक गावातील शेतकऱ्यांनी आपल्या गावातील ग्रामसभेला उपस्थित न राहता शेतकऱ्याच्या या आक्रोश मोर्चामध्ये परळी तालुका अंबाजोगाई तालुक्यातील हजारो शेतकरी बांधवांनी सत्ताधाऱ्यांच्या विरोधात प्रचंड घोषणाबाजी करत भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर चौक ते उपजिल्हाधिकारी कार्यालय येथे धडकला राज्यातील सत्ताधारी नेतेमंडळी व राज्यातील चालत असलेल्या कारभाराविषयी तीव्र नाराजगी पहावयास मिळाली शेतकऱ्याच्या पदरात सातत्याने होत असलेली निराशा व सरकारकडून घोषणांचा पाऊस याकडे शेतकऱ्यांनी लक्ष केंद्रित केले होते सत्ताधाऱ्यांच्या विरोधात सत्ताधारी पक्षातील शेतकऱ्यांनीच काढलेला मोर्चा आणि मोर्चात हजारो शेतकऱ्यांची उपस्थिती लक्षणीय ठरली सत्ताधारी पक्षातील बर्दापूर जिल्हा परिषदेचे माजी सदस्य अविनाश मोरे यांच्या नेतृत्वाखाली उपजिल्हाधिकारी कार्यालयावर काढलेल्या शेतकऱ्यांच्या आक्रोश मोर्चा ने सरकारला घाम फोडला आहे

शासनाच्या सर्व नियमाचे पालन करीत शेतकऱ्याचा आक्रोश मोर्चा कोणताही अनुचित प्रकार न घडता शांततेत पार पडला यावेळी पोलिसांनीही चोक बंदोबस्त केला होता मोर्चा शांततेत पार पाडला परंतु मोर्चे करायचे निवेदन घेण्यासाठी उपजिल्हाधिकारी कार्यालयात



निवेदन स्वीकारण्यासाठी एकही अधिकारी अथवा कर्मचारी उपस्थित नसल्याने मोर्चात सहभागी झालेल्या सर्व नेत्यांनी व शेतकऱ्यांनी उपजिल्हाधिकारी कार्यालयासमोर थोड्या वेळासाठी ठिय्या आंदोलन पुन्हा चालू केले व काही कालावधीने नायब तहसीलदार यांनी येऊन निवेदन स्वीकारले व आंदोलन शेतकरी शांत झालेशेतकऱ्याच्या विविध मागण्याची दखल प्रशासनाने येथे अकरा तारखेपर्यंत न घेतल्यास येत्या १५ डिसेंबर रोजी अंबाजोगाई तालुक्यात ठीक ठिकाणी रास्ता रोको आंदोलन करून चक्काजाम करण्याचा इशाराही अविनाश मोरे यांनी दिला आहे या मोर्चाचे नेतृत्व करणारेया मोर्चात कॉंग्रेड अजय बुरांडे,शेतकरी नेते गंगाभीषण थावरे कालिदास आपेट श्याम आपेट कॉ पोटभरे गुरुजी दत्ता काका जाधव अमोल चव्हाण जीवनराव किर्दत विलास जगताप नाना भगत सत्यवान निकम निलेश धुमाळ विलास धुमाळ मारूतीराव गुट्टे वसंतराव शिंदे विलास दादा देशमुख शशी गौर शेटे व्यंकटराव देशमुख पवार बापु देवळा पंजाबराव देशमुख बंडु भाउ चाटे तुलुक्यातील सर्व शेतकरी यांच्यासह अनेक शेतकरी नेते कार्यकर्ते व शेतकरी मोठ्या संख्येत उपस्थित होते



## शासकीय कार्यालयातील आवक -जावक अर्जाची अर्जदाराला सद्यस्थिती माहिती

### मोबाईलद्वारे मिळण्यासाठी मिलिंद सरपते यांची विभागीय आयुक्तांकडे मागणी

बीड ।प्रतिनिधी

शासकीय कार्यालयात आलेल्या आवक जावक पत्राची सद्यस्थिती अर्जदाराच्या मोबाईलवर एसएमएस प्रणाली द्वारे सुरू करा. विभागीय आयुक्तांना निवेदन मिलिंद सरपते सामाजिक तथा सदस्य वंचित बहुजन आघाडी बीड शहर यांनी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे. या संदर्भात विभागीय

आयुक्त औरंगाबाद यांना दिलेल्या निवेदनात पुढे म्हटले की, महाराष्ट्रातील प्रत्येक शासकीय कार्यालयात गावपातळी ते मंत्रालय पर्यंत आपल्या कामासाठी अर्ज व तक्रारी करीत असतो. परंतु या अर्जदारास आपण केलेल्या अर्ज कोणत्या अधिकाऱ्याच्या टेबलावर प्रलंबित आहे व कोणत्या कारणासाठी प्रलंबित आहे.हे कळून येत नसते. व काही अधिकारी विनाकारण सुद्धा संबंधित अर्ज प्रलंबित ठेवत असतात. त्यामुळे सामान्य नागरिकाला आपल्या अर्जाची सध्याची स्थिती काय आहे हे कळत नसते.तरी आपणास विनंती आहे की,शासकीय कार्यालयात आलेल्या आवक जावक पत्राची सद्यस्थिती अर्जदाराच्या मोबाईलवर एसएमएस प्रणाली द्वारे सुरू करावे जेणेकरून सामान्य नागरिकास त्रास सहन करावा लागणार नाही. व अधिकारी यांच्या टेबलावर आलेले अर्ज प्रलंबित राहणार नाहीत. व यातून शासकीय कार्यालयात होणाऱ्या दिरंगाई रोखण्यासाठी मदत होईल.असे एक बीडकर मिलिंद भास्कर सरपते सामाजिक तथा सदस्य वंचित बहुजन आघाडी बीड शहर यांनी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे.



गेवराई ( प्रतिनिधी)ग्रामपंचायत कार्यालय ताकडगाव येथील १५ व्या वित्त आयोगातुन केलेल्या विविध विकास कामाची व खरेदी केलेल्या वस्तूची तात्काळ चौकशी करून योग्य ती कार्यवाही करण्यात यावी. दत्ता गिरी यांचे गेवराई पंचायत समिती समोर समोर उपोषण सुरू केले असून सविस्तर वृद्ध असे की मौजे ताकडगाव ग्रामपंचायत कार्यालय येथील कार्यालयामध्ये १५ व्या वित्त आयोगाच्या विविध विकास कामामध्ये व खरेदी केलेल्या वस्तू मध्ये खूप मोठा भ्रष्टाचार झालेला दिसत आहे.तरी आपणास विनंती आहे की, खालील मुद्दे निहाय चौकशी करण्यात यावी १) जिल्हा परिषद शाळेला आवश्यक साहित्य खरेदी. रक्कम ९२००० हजार रू २) अंगणवाडी आवश्यक कामे व साहित्य खरेदी. रक्कम ७७००० हजार रु ३) आरोग्य विषयक मेडिक्लोर व इतर साहित्य खरेदी रक्कम ९४००० हजार रुपये ४) बंदिस्त नाली, घनकचरा व्यवस्थापन, कचराकुंडी शेचालाय ८९९००हजार रु ५) वीजबिल भरणा, पाणी पुरवठा साहित्य खरेदी, मोटार दुरुस्ती १. लक्ष ८८ रु .६)सुदर्शन सोलार अँड मल्टीसर्विसेस यांनी आतापर्यंत शासनास सादर केलेल्या ऋढढ च्या बिलाची चौकशी करावी. ७) १५ वीत्त आयोगाअंतर्गत केलेल्या कामाचे इस्टीमेट व चइ याची झेरोक्स प्रती देण्यात याव्या व योग्य ती तपासणी करण्यात यावी.तरी आपण वरील सर्व मुद्दे निहाय चौकशी करून जे कोणी दोषी असतील त्यांच्यावर योग्य ती कार्यवाही करावी . या साठी ३०/११/२०२३ रोजी दत्ता गिरी यांनी उपोषण सुरू केले असून पुढे म्हणाले की जोपर्यंत मागण्या पूर्ण होत नाहीत तोपर्यंत उपोषण सोडणार नाही. नसता आपल्या कार्यालय समोर अन्नत्याग, अमरण उपोषण सुरू केले आहे.

# बीड जिल्ह्यातील खेळाडूंची जागतिक स्तरावर कामगिरी

### खेळाडूंनी खिलाडू वृत्ती जोपासली पाहिजे-तर बीड जिल्ह्यातील खेळाडूच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहणार -खा.डॉ.प्रीतम ताई मुंडे

आष्टी । प्रतिनिधी

**बीड जिल्ह्यातील खेळाडूंनी अत्यंत मेहनतीने आणि परिश्रमाने राज्य, राष्ट्रीय आणि जागतिक पातळीवर आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवला आहे.. या कबड्डी स्पर्धेतील खेळाडूंनी दर्जेदार खेळ करावा आणि खेळाडू वृत्तीचे प्रदर्शन करावे असे आवाहन बीड लोकसभा मतदारसंघाच्या खासदार डॉ. प्रीतम ताई गोपीनाथराव मुंडे यांनी केले..**







आष्टी येथे महाराष्ट्र क्रीडा संचालनालय, कबड्डी असोसिएशन बीड जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय आणि आष्टी येथील अनिषा ग्लोबल इंटरनॅशनल स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित १७ वर्षे वयोगटातील मुले आणि मुलींच्या राज्यस्तरीय शालेय कबड्डी क्रीडा स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर या स्पर्धेचे मुख्य संयोजक आ. सुरेश धस, माजी आ. भीमराव धोंडे, जिल्हा क्रीडा अधिकारी सुहासिनी देशमुख, पो. नि. संतोष खेतमाळस, विजय गोल्हार, भाजपा तालुकाध्यक्ष ऍड. साहेबराव म्हस्के, वाल्मिक निकाळजे, आदिनाथ सानप, किशोर

हंबर्डे, जि. प. सदस्य अमर निंबाळकर, जि. प.सदस्य माऊली जरांगे, सभापती बद्रीनाथ जगताप, सभापती रमजान तांबोळी, गणेश शिंदे, कुस्तीपटू सोनाली तोडकर, खेळाडू संदेश देशमुख आदी उपस्थित होते. पुढे बोलताना खासदार डॉ. प्रीतम मुंडे म्हणाल्या की, सध्या क्रिकेट या खेळाला इतर मैदानी खेळापेक्षा जास्त प्रसिद्धी मिळते.. परंतु क्रिकेटमध्ये ग्रामीण भागातील खेळाडूंना प्रगतीसाठी शहरी भागामध्ये जाऊन त्या ठिकाणी नैपुण्य दाखवावे लागते.. क्रिकेट या खेळाला इतर मैदानी खेळा पेक्षा कमी प्रसिद्धी मिळत आहे.. शालेय स्तरावरील १९ वर्षाखालील मुले आणि मुलींच्या महाराष्ट्र राज्यातील आठ विभागातील संघांनी या राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेत स्पर्धेत भाग घेतला असून प्रत्येक विभागातील दर्जेदार संघ या ठिकाणी आपल्या क्रीडा नैपुण्याचे प्रदर्शन करणार असून या सर्व खेळाडूंनी चांगल्या खेळाचे प्रदर्शन करावे आणि खिलाडू वृत्ती जोपासून आपल्या पुढील प्रगतीसाठी प्रयत्न करावेत असे आवाहन केले.. यावेळी बोलताना मुख्य संयोजक आ. सुरेश धस म्हणाले की, आष्टी येथे आयोजित करण्यात

आलेली ही तिसरी राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा असून.. आम्ही गेल्या एक वर्षापासून प्रयत्न केल्यानंतर या १७ वर्षाखाली मुले आणि मुलींच्या राज्य अजिंक्यपद कबड्डी स्पर्धेचे आयोजक म्हणून आम्हाला संधी दिली आहे याबद्दल सर्व क्रीडा विभागाचे आपण आभारी मानतो असे सांगत आष्टी तालुक्यातील महाराष्ट्र केसरी सईद चाऊस, पैलवान सोनाली तोडकर, पैलवान राहल आवारे आणि आंतरराष्ट्रीय धावपटू अविनाश साबळे यांनी जागतिक पातळीवर आपले क्रीडा कौशल्य दाखवले आहे.. यावेळी माजी आमदार भीमराव धोंडे म्हणाले की, ग्रामीण भागातील खेळाडूंमध्ये शहरी भागातील खेळाडूंपेक्षा कौशल्य अधिक असते मात्र आर्थिक दृष्ट्या कमकुवत असल्यामुळे त्यांना शहरी भागासारख्या सुविधा मिळत नाहीत परंतु तरीही अत्यंत जिद्दीने आणि परिश्रमपूर्वक ग्रामीण भागातील खेळाडूंनी आपल्या राज्य पातळीवर आणि राष्ट्रीय पातळीवर यश मिळवले आहे असे सांगितले.. उद्घाटन समारंभ नंतर या विभागातील संघांमध्ये सामने पार पडले.

# कृषीदुतांनी दातपाडी येथील शेतकऱ्यांना बियाणाचे टॅग

### त्यांचे प्रकार आणि बियांचे वर्गीकरण याबद्दल दिली माहिती

पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला संलग्नित कृषी महाविद्यालय, कोंघारा येथील सातव्या सत्राच्या विद्यार्थीनींनी ग्रामीण कृषी कार्यानुभव या कार्यक्रमा अंतर्गत दातपाडी येथील शेतकऱ्यांना बियाणाची टॅग व त्यांचे वर्गीकरण कसे असते यासंदर्भात गावातील शेतकरी वर्गाला सविस्तर माहिती दिली. यामध्ये उत्तम प्रतीची बियाणे त्याच्या टॅग च्या प्रकारानुसार कसे निवडावे व टॅगनुसार बियाणाची शुद्धता कशी तपासावी व सत्यप्रत बियाण्याच्या तुलनेत प्रमाणित बियाणे याचा वापर किती करावा व ते खरेदी करताना कोणती काळजी घ्यावी यासंदर्भात सविस्तर माहिती दिली. कृषी महाविद्यालय कोंघारा येथील ठ-थए च्या विद्यार्थीनी रासेश्वरी जुमडे, वैष्णवी काळे, सृष्टि गायमुखे, शर्वरी दसोदे, वैष्णवी कोटकर यांनी या मार्गदर्शन कार्यक्रमाचे



आयोजन केले. शेतकऱ्यांनी अधिकृत विक्रेत्यांकडूनच बियाणांची खरेदी करावीत. बियाणांची खरेदी करताना पक्की पावती घ्यावी. बियाणांचे वेष्टन, पिशवी, टॅग, खरेदीची पावती व पॉकिटातील थोडे बियाणे पिकाची कापणी होईपर्यत जपून ठेवावेत. भेसळीची शंका दूर करण्यासाठी बियाणांचे पाकीट सीलबंद व मोहोरबंद असल्याची खात्री करावी. पॉकिटावरील बियाणे वापरण्याची अंतिम मुदत व किंमत तपासून घ्यावी. बोगस बियाणांविषयी काही तक्रारी असल्यास जिल्हा अधीक्षक, कृषी अधिकारी, कृषी विकास अधिकारी, उपविभागीय कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी, पंचायत समितीचे कृषी अधिकारी, मंडळ कृषी अधिकारी, कृषी पर्यवेक्षक, कृषी सहायक यांच्याशी संपर्क साधावा. अशी माहिती कृषी महाविद्यालयाचे प्राध्यापक व वनस्पती शास्त्र विभागाचे विशेषतज्ञ प्रा. पीयूष वासुरके सर यांनी शेतकऱ्यांना दिली. यावेळी कृषी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सविता ढोके मॅम वनस्पती शास्त्र विभागाचे विशेषतज्ञ प्रा. संकेत येलोरे व प्राध्यापिका डॉ. पी. डी. जोगी, कार्यक्रम अधिकारी प्रा. डि. आर. जाधव, आणि प्रा. एन. डी. राऊत, प्रा. एस. एस. धोटे व सर्व प्राध्यापकांचे मार्गदर्शन लाभले.

आम्ही या पत्राव्दारे आपणास कळवू इच्छितो की, राज्य शासनाच्या अधिनियमानुसार व सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार महाराष्ट्र राज्यातील दुकाने आस्थापना यांचे नाम फलक मराठीत व मोठ्या अक्षरातच असले पाहिजे या करीला दिनांक २५ नोव्हेंबर २०२३ पर्यंत मुदत देण्यात आली आहे. परंतु आमच्या असे निदर्शनास आले आहे की, बीड शहरात काहीजण या देशाच्या सर्वोच्च न्यायालयाचाही आदेश जुमानत नस्तीलतर काय करायला हवं? तुम्ही सांगा सर्वोच्च न्यायालयाचे पालन करायचा कालावधी संपलेला आहे. परंतु दुकानाने आणि आस्थपना यांचे नाम फलकावर प्रथम दर्शनी अर्थात सुरवातीला मराठी भाषेत देवनागी लिपित नाव लिहिने आवश्यक आहे. तसेच इतर भाषेत देखील नाव लिहिले जाणार असेतर त्या भाषेच्या तुलणेत मराठीतील नाव हे मोठ्या आक्षरात असले पाहिजे. एवढेच नव्हेतर ज्या आस्थापना मध्ये पुर्विले जाते. किंवा विकले जाते. अशा आस्थापनाच्या नाम फलकावर महान व्यक्तीची किंवा गडकिल्यांची नावे लिहू नये या नियमाचे उलंगन केल्यास संबंधीत दुकाने व आस्थपना मालकांवर महाराष्ट्र दुकाने व आस्थापना व अधिनियम २०१७ च्या तरतुदीनुसार न्यायलयीन कार्यवाही करता येऊ शकते. असे असतांना आपण कोणाच्या आदेशाचीवाट पाहत आहे. महाराष्ट्र शासनाव्दारे महाराष्ट्र अधिनियम नं. २४ मध्ये दिनांक १७ मार्च २०१७ अन्वये महाराष्ट्र दुकाने व आस्थापना अधिनियम २०२२ कलम ३६ क १ चा कलम ६ अन्वये नोंदणी केलेल्या प्रत्येक आस्थपनेला किंवा



ज्या आस्थापनेला कलम ? लागू आहे. प्रत्येक आस्थापनेचा नाम फलक देवनागी लिपीत मराठी भाषेमध्ये असला पाहिजे. परंतु असा आस्थापनेच्या नियुक्त्याकडे देवनागरी लिपित मराठी भाषेव्यतिरिक्त इतर कोणत्याही भाषेतील व लिपितील नाम फलक देखील मराठी भाषेतील आक्षराचा टकं आकारा पेक्षा लहान असता कामानये म्हणजेच मराठी टकं आकार ईतर कोणत्याही भाषा पेक्षा मोठ्या आक्षरात असणे आवश्यक आहे. आम्ही या पत्राव्दारे आपणास विनंती करी ईच्छीतो की, बीड शहरातील ज्या दुकानाची व आस्थापनाची नावे ईतर भाषेमध्ये असतील तर त्यांनी ३ डिसेबर २०२३ रोजी पर्यंत बदलावी अन्यथा महाराष्ट्र नवनिर्माण सेना तिवृ स्वरुपाचे अंदोलन छेडेल याची नोंद घ्यावी,असा इशारा करण लोढे यांनी दिला आहे.



राष्ट्रवादी कॉंग्रेस सामाजिक न्यायविभाग तालुका उपाध्यक्ष पदी मिलिंद ठोकळ यांची आमचे नेते डॉ योगेश भैय्या साहेबांनी निवड केली .



राज्यासह पूर्ण देशात राबविण्यात येत असणारी विकसित भारत संकल्प यात्रेची उद्घाटन आज धनेगाव ता.केज येथे करण्यात आले यावेळी भाजपा ज्येष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा काकाजी,तहसीलदार अभिजीत जगताप,गटविकास अधिकारी राजेश मोराळे,भाजपा तालुकाध्यक्ष भगवान केदार ,सुनील आबा गलांडे ,शरद इंगळे, अंगद भाऊ गव्हाणे, सरपंच आकांक्षा गुजर ताई ,उपसरपंच किशोर सोनवणे,सुनील गुजर,मंगेश गुजर ,रामरतन गुजर,सतीश गुजर,पशुपती पाटील यांच्यासह पंचायत समिती व तहसील कार्यालयाचा कर्मचारीवर्ग व लाभार्थी

# विस्तार अधिकारी आणि जन माहिती अधिकार्यांनी तक्रारदाराच्या तक्रारीची दखल न घेतल्याने

## अशोक कातखडे यांच्या तक्रारीचे प्रकरण येणार अंगलट

शिरुर ।प्रतिनिधी


शिरुर कासार तालुक्याचे पंचायत समिति अधिकारी आणि जन माहिती अधिकारी यांनी कामात केलेला चालढकलपणा आता अंगलट येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. सामाजिक कार्यकर्ते अशोक कातखडे यांच्या तक्रारीला फाट्यावर मारण्याचा प्रकार केल्याने सदरील प्रकरण नक्कीच गाजणार हे दिसत आहे.अ दि. ०४/०८/२०२३ रोजी श्री अशोक कातखडे सामाजिक कार्यकर्त यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये नोंदणीकृत डाकेने पोस्टाने जन माहिती अधिकारी पंचायत समिती ता. शिरूर (का) जि. बीड यांना ग्रा. प. कार्यालय निमगांव (मा) ता. शिरूर (का) जि. बीड येथील दि. ०१/०१/ २०२३ ते आजपर्यंत मुद्दा क्र. ०१ ते ०५ मुद्यांची माहिती मागणी करण्यात आली होती सदरिल माहितीस अनुसरून मा गटविकास अधिकारी तथा प्रथम अपीलीय अधिकारी पं. स. शिरूर ( का) यांनी दि. २२/०८/२०२३ रोजी यांच्या स्वाक्षरीचे पत्र जा.क्र. पंसशि / पंचायत / कावि/ ३९२ - / २०२३ नं ०३७१६ दि. २२/०८/२०२३ रोजी लेखी पत्र माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम ६ (३) अन्वये मा ग्रामविकास अधिकारी तथा जन माहिती अधिकारी निमगांव (मा) यांना वर्ग केले आहे. सदरिल पत्रात नमुद मुद्यास अनुसरून आर्जदार यांना माहिती उपलब्ध करून माहितीचा निपटारा करून एक प्रत कार्यालयास देण्यात यावी आसे स्पष्ट पणे पत्रात नमुद आसताना जाणिवपुर्वक जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी श्री गोविंद मिसाळ यांनी कर्तव्यात कसूर करून व पदाचा गैरवापर करून शासन निर्णयाचे पालन न करता आर्जदार यांना कुठलीही माहिती उपलब्ध करून दिली नाही. त्यामुळे आर्जदार यांनी दि. ०३/१०/२०२३ रोजी आर्जदार यांनी प्रथम अपील पं . स. शिरूर (का) यांना नोंदणीकृत डाकेने पोस्टाने पाठवले आहे. त्या पत्रास अनुसरून शिंदे एस यु प्रथम अपीलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं) शिरूर (का) यांचे जा क्र. पंसशि / पंचायत / कावि / ४२१ / २०२३ दि. १८/१०/२०२३ रोजीचे पत्र दि. २६/ १०/२०२३ रोजी ११:०० वा गुगल मिट ॲप्लिकेशन व्हिडिओ कॉनफ्रन्स वर सुनावणी घेण्यात येणार आहे. आसे पत्र आर्जदार यांना प्राप्त झाले सदर सुनावणीस आर्जदार हे उपस्थित राहिले आहे. परंतू नेटवर्क मध्ये आडथळा निर्माण झाल्यामुळे आर्जदार हे प्रथम अपीलीय अधिकारी पं. स. शिरूर (का) यांच्या दालनात प्रत्यक्ष उपस्थित राहिले आहेत. व जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी ग्रा. प. निमगांव (मा) यांनी कश्या प्रकारे कर्तव्यात कसूर व पदाचा गैरवापर करून नैसर्गिक न्याय तत्वाचे पालन केलेले नाही. त्यामुळे आर्जदार यांना शारीरिक, मानसिक व आर्थिक त्रास झाला आहे. त्यामुळे संबंधितांविरुद्ध महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल ) नियम १९७९ कलम १० (२) (३ ) अन्वये शिस्तभंगाची कारवाई व कलम २० ( १) २० ( २ ) अन्वये शास्ती व दंड व सेवा पुस्तिकेत नोंद करणे याबाबत सविस्तर मुद्देनिहाय व शासन निर्णयास अनुसरून व कायद्यानुसार कलमासंहित शिंदे एस. यु. प्रथम अपीलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी पं. स. शिरूर (का) यांच्या समोर युक्तिवाद केला आहे परंतू शिंदे एस. यु. प्रथम अपीलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी पं. स. शिरूर (का) यांना कायद्याने दिलेले अधिकार व शासन निर्णयाचे पालन करून वरिष्ठांकडे शिफारस करण्याचे अधिकार आसताना त्यांनी जा क्र. पंसशि / पंचायत / कावि / ५५४ / २०२३ नं ४६२६ दि. २७/१०/ २०२३ रोजी देण्यात आलेला आदेश आर्जदार यांना दि. १६/११/ २०२३ रोजी १० वा २१ मि प्राप्त झाला आहे. सदर आदेशाचे आर्जदार यांनी अवलोकन केले आसता.

त्यामध्ये नमुद केले आहे की जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी ग्रा. प. निमगांव (मा) यांना दि. २२/०८/२०२३ रोजी पं. स. शिरूर (का) यांनी पत्र देऊन सुद्धा आर्जदार यांना माहिती उपलब्ध करून दिली नाही . म्हणजे त्यांनी कर्तव्यात कसूर केलेला आहे. हि देखील बाब गंभीर स्वरूपाची बाब आहे व ग्रा. से. यांनी कर्तव्यात कसूर केलेला आहे हि बाब सिद्ध झालेली आहे. अ परंतू शिंदे एस यु प्रथम अपीलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी पं. स. शिरूर (का) यांनी कायद्याचे पालन केलेले नाही तसेच शासन परीपत्रकाची आंमलबजावणी केलेली नाही व कायद्याचा गैरवापर करून पदाचा गैरवापर करून दुरुपयोग केला व नैसर्गिक न्याय तत्वाचे पालन केलेले नाही जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी यांच्याविरुद्ध कारवाई करणे संदर्भात वरिष्ठांकडे शिफारस करणे ऐवजी



संगनमत करून कारवाई पासून वाचवण्याचे काम केल्यामुळे आर्जदार यांनी दि. २४/ ११/२०२३ रोजी मा प्रधान सचिव ग्रामविकास पंचायत विभाग मुंबई मा. + विभागीय आयुक्त कार्यालय छ संभाजीनगर, व मा. गटविकास अधिकारी पं. स. शिरूर (का) यांना नोंदणीकृत डाकेने पत्रव्यवहार केला आहे मा. जिल्हाधिकारी बीड, मा . मुख्य कार्यकारी अधिकारी जि. प. बीड, मा. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.प.) जि. प. बीड यांना आवक जावक विभागात पत्रव्यवहार सर्व पुराव्यासह शिंदे एस. यु. प्रथम अपीलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी पं. स. शिरूर (का) व गोविंद मिसाळ जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, सरपंच ग्रा.प. निमगांव (मा) यांच्याविरुद्ध महाराष्ट्र नागरी सेवा व ( शिस्त व अपिल ) नियम १९७९ कलम १० (२) (३) अन्वये शिस्तभंगाची कारवाई व निलंबनाची कारवाई करणे अन्यथा मा. न्यायालयात दाद मागण्याचा हक्क राखीव ठेवत आहे. याबाबत लेखी तक्रार पुराव्यासह करण्यात आली आहे.

# मतदार संघातील रस्त्यांच्या दर्जोन्नतीसाठी आ. नमिता मुंदडा यांनी आणला २७ कोटींचा निधी



अंबाजोगाई - केज विधानसभा मतदार संघाच्या आमदार नमिता अक्षय मुंदडा यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे केज विधानसभा मतदार संघातील विकासकामांसाठी कोट्यावधीच्या निधीचा ओघ सुरुच आहे. राज्य शासनाने पुन्हा एकदा आ. मुंदडा यांच्या पाठपुराव्याला प्रतिसाद देत केज मतदार संघातील ग्रामीण भागातील ११ रस्त्यांच्या दर्जोन्नतीसाठी तब्बल २७ कोटी ४० लाख रुपयांचा निधी मंजूर केला आहे.

आ. नमिता मुंदडा यांच्या कार्यकाळात केज मतदार मतदार संघावर निधीचा वर्षाव सुरुच आहे. त्यातून अनेक विकासकामे प्रगतीपथावर आहेत. दरम्यान, मतदार संघातील ग्रामीण भागातील दैना झालेल्या रस्त्यांच्या कामासाठी आ. नमिता मुंदडा यांनी शासनदरबारी पाठपुरावा सुरु ठेवला होता. पुन्हा एकदा आ. मुंदडा यांच्या मागण्यांची दखल घेत राज्य शासनाने मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेच्या दुसऱ्या टप्प्यात संशोधन व विकास अंतर्गत केज मतदार संघातील रस्त्यांच्या दर्जोन्नतीसाठी २५ कोटी २३ लाख रुपये व पाच वर्षांच्या दुरुस्ती देखभालीसाठी २ कोटी १७ लाख रुपये असा एकूण २७ कोटी ४० लाख रुपयांचा निधी मंजूर केला आहे.



बीड येथील स्वातंत्र्य सेनानी रामराव आवरगावकर विधी महाविद्यालयात भारतीय संविधान दिन साजरा........दि.२६ नोव्हेंबर रोजी सकाळी नऊ वाजता स्वातंत्र्य सेनानी रामराव आवरगावकर विधी महाविद्यालयात अमृत महोत्सवी भारतीय संविधान दिन साजरा करण्यात आला.या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य मा.डॉ.प्रमोद वाघमारे होते त्यांच्या हस्ते भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले यानंतर भारतीय संविधानाच्या उद्देशिकेच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले तसेच संविधानाचे उद्देशकाचे सामूहिक वाचन करण्यात आले यावेळी महाविद्यालयातील विद्यार्थी,विद्यार्थिनी, प्राध्यापक,शिक्षकेतर कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते.

# रुग्णालयांतील अग्निरोधक यंत्रणेसाठी निधी देणार कधी??

## शासन आगीच्या दुर्घटनेची वाट पहातंय का?? शासन आपल्या दारी सारख्या इव्हेंट साठी कोट्यवधींचा निधी:- डॉ.गणेश ढवळे

बीड ।प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील जिल्हा रुग्णालयासह अधिनस्थ इतर १७ अशा एकुण १८ आरोग्य संस्थांच्या इमारतीमध्ये अग्निरोधक यंत्रणा उभारण्यासाठी शासनाने अंदाजपत्रके मागवली खरी परंतु त्यानुसार जिल्हा आरोग्य प्रशासनाने शासनाला २४ कोटी ३९ लाख रुपयांचे अंदाजपत्रक पाठवुन दिड वर्ष उलटूनही निधी देण्याबाबत शासन स्तरावरून कुठलीही हालचाल करण्यात आली नाही.विशेष म्हणजे सरकार स्वतःच्या जाहिरातीसाठी शासन आपल्या दारी कार्यक्रमासाठी जिल्हा नियोजन समितीमधुन कोट्यवधींचा खर्च करत असताना अग्निरोधक यंत्रणेसाठी दमडीही खर्च करायला तयार नाही.भंडारा आणि अहमदनगर जिल्ह्यातील रूग्णालयांना लागलेल्या आगीच्या दुर्घटनेची शासन वाट पहात आहे का? असा प्रश्न सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी जिल्हाधिकारी, जिल्हा शल्यचिकित्सक जिल्हा रुग्णालय बीड यांच्या मार्फत मुख्यमंत्री, प्रधान सचिव, आरोग्यमंत्री, सचिव सार्वजनिक आरोग्य मंत्रालय मुंबई यांना विचारला असुन तातडीने निधी उपलब्ध करून देण्यात यावा यासाठी आंदोलनाचा ईशारा दिला आहे.



जानेवारी २०२१ मध्ये भंडारा जिल्हा रुग्णालयातील ईमारतीला आग लागली.अग्निरोधक यंत्रणा नसल्याने रौद्ररूप धारण केलेल्या आगीने बालकांच्या अतिदक्षता विभागातील ११ नवजात बालके मृत्युमुखी पडली होती.त्यानंतर १० महिन्यांनी नोव्हेंबर २०२१ मध्ये अहमदनगर जिल्हा रुग्णालयात अशीच घटना घडली यात १० रूग्णांचा होरपळुन मृत्यू झाला होता.मात्र यातुन कोणताही धडा घेतल्याचे दिसून येत नाही.

२०२१ मध्ये भंडारा आणि अहमदनगर जिल्हा रुग्णालयात लागलेल्या आगीत नवजात बालक आणि रूग्णांचा मृत्यू झाला.याअनुषंगाने बीड जिल्हा रुग्णालयासह ईतर आरोग्य संस्थांच्या इमारतीमध्ये अग्निरोधक यंत्रणा बसविण्यात यावी यासाठी शासन दरबारी आंदोलने,निवेदनांनंतर जिल्हा रुग्णालय प्रशासनाने २०२२ मध्ये शासनाला बीड जिल्ह्यातील एकुण १८आरोग्य संस्थांच्या इमारतीमध्ये अग्निरोधक यंत्रणा बसविण्यासाठी एकुण २४ कोटी ३९ लाख रुपयांचा निधी आवश्यक असल्याचे अंदाजपत्रक पाठवले मात्र याला दिड वर्षापेक्षाही जास्त कालावधी उलटुनही शासन स्तरावरून निधी देण्याबाबत हालचाल नाही त्यामुळे शासन भंडारा अथवा अहमदनगर जिल्हा रुग्णालयात घडलेल्या आगीच्या दुर्दैवी घटनेची वाट पहात आहे काय??असा प्रश्न पडला आहे. दि.४ डिसेंबर सोमवार रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करण्यात येणार आहे.

बीड जिल्ह्यातील रूग्णालयाच्या इमारतीसाठी शासन स्तरावरून निधी देण्याबाबत कोणतीही हालचाल नसताना शासन आपल्या दारीकार्यक्रमासाठी कोट्यवधींचा निधी खर्च करणारी जिल्हा नियोजन समितीने अग्निरोधक यंत्रणेसाठी दमडीही दिली नाही हे विशेष.याबद्दल जनसामान्यांच्या मनात तिव्र संतापाची भावना आहे.

# संविधान दिना निम्मित भव्य रक्तदान शिबिर संपन्न

## ५२ रक्तदात्यांनी केल रक्तदान

बीड ।प्रतिनिधी

बीड जिल्हा रुग्णालया मध्ये मागील अनेक महिन्यांपासून रक्ताचा प्रचंड प्रमाणात तुटवडा असल्याने रुग्णांना रक्त मिळत नसल्याने प्रचंड हाल होत होते. ही बाबा लक्षात येताच भारतीय संविधान दिनाच्या निमित्ताने बीड शहरातील संविधान प्रेमींच्या वतीने व ड. राजेश शिंदे यांच्या मित्रपरिवाराच्या वतीने दि. २५ नोव्हेंबर रोजी भव्य रक्तदान शिबीर आयोजीत केल होते या रक्तदान शिबिरात ५२ रक्तदात्यांनी रक्तदान केले.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, मागील अनेक महिन्यापासून बीड जिल्हा रुग्णालय मध्ये रक्ताचा प्रचंड प्रमाणात तुटवडा असल्याने भारतीय संविधान दिना निम्मित रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरास प्रमुख पाहुणे म्हणून शल्य चिकित्सक अशोक बडे, डॉ विकास आठवले, अतिरीक्त जिल्हा शल्य चिकीत्सक बीड, शेकाप चे भाई मोहन गुंड, रिपाईचे राजु जोगदंड, मराठा क्रांती मोर्चाचे सी.ए. जाधव, भाकप चे जेष्ठ नेते नामदेव चव्हाण, प्रा. प्रदीप रोडे, प्रा. विक्रम धन्वे,ड. अविनाश गंडले, प्रा. धम्मपाल घुमरे, पत्रकार सुनील डोंगरे, माकपचे मोहन जाधव, शिवसेनेचे संतोष जाधव, शरद चव्हाण, जोतिराम हुरकुडे, उद्धव खरात, दिव्य मराठीचे आनंद डोंगरे, आनंद वीर,यांच्या सह रकतपेढी मधील कर्मचारी उपस्थित होते. या वेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन करून संविधानाच्या उद्देशीकेच सामूहिक वाचन करून रक्तदान शिबिरास सुरुवात करण्यात आली. या शिबिरामध्ये भाई मोहन गुंड, प्रा. धम्मपाल




घुमरे, ज्योतीराम हुरकुडे, सरपंच भाऊराव प्रभाळे, गणेश भालेराव, संगमेश्वर आंधळकर,ड. राजेश शिंदे, अमोल चव्हाण घरकुल विभाग पं.स.बीड,वैभव मोरे(सरपंच रौळसगाव) गणेश मोरे (उप प्रा.गोरे इंग्लिश स्कूल), मल्हारी जाधव, शाम वीर, राहुल राठोड, अशोक कदम, राजु इनामदार, विश्वास जाधव, अविनाश वीर, सुमित गायकवाड, संघर्ष तांगडे, धनंजय कांडेकर, ऋतुराज साबळे, रोहित कुचेकर, सुहास जायभाये, कुंडलिक खेत्री, अमोल पाठक, तेजस वडमारे, आनंद डोंगरे, रवी राऊत, महेश खाडे, आनंद गायकवाड, निलेश गाडेकर, सतिष वाघ, फेरोज शेख, मुस्तकीन शेख, संकेत कांबळे, क्षितीज उजगरे, विशाल तांगडे, रोहन गायकवाड, सागर फालके, प्रवीण शेवलकर, अमोल बोकान, गणेश तावरे, चांदमाणी गायकवाड, बाळू पटेकर, सह ५२ रक्तदात्यांनी रक्तदान केले सामाजिक जबाबदारी म्हणून मागील अनेक वर्षापासून सामाजिक क्षेत्रात काम करणारे ड. राजेश शिंदे, संगमेश्वर आंधळकर, सुनील डोंगरे, मल्हारी जाधव, यांच्या सह संविधान प्रेमींच्या वतीने भारतीय संविधान दिनाच्या निमित्ताने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन केले आहे. या रक्तदान शिबिरास राजु इनामदार, परमेश्वर गोंडे, कबिर जाधव, सचिन शिंदे, प्रमोद लाखे यांच्यासह असंख्य कार्यकर्त्यांनी सहकार्य केल. कार्यक्रमाचं सूत्रसंचालन सुनील डोंगरे तर प्रास्ताविक ड. राजेश शिंदे, व आभार प्रदर्शन संगमेश्वर आंधळकर यांनी केले तर अडचणीच्या काळात रक्तदान शिबीर घेतल्याने जिल्हा रुग्णालयातील अधिकारी व कर्मचारी यांनी आयोजकांचे आभार मानले.

# बँकेस कर्ज वसुलीसाठी दिलेला धनादेश न वटल्याने आरोपीस ३ महिने कारावास व दंड

बीड ।प्रतिनिधी

(दि.२९-११-२०२३) या प्रकरणाची थोडक्यात हकीगत अशी आहे की, तांदळवाडी, ता. वाशी, जि. उस्मानाबाद येथील आशाबाई भ्र. अशोक चौधरी यांनी प्रियदर्शनी महिला नागरी सह. बँक लि. बीड यांचेकडून कर्ज घेतले होते. सदर कर्ज परतफेडीपोटी आरोपीने फिर्यादी बँकेस रु.९०,०००/- चा धनादेश दिला, परंतू सदर धनादेश न वटल्याने फिर्यादी बँकेने आरोपी विरुध्द बीड येथील मा. न्यायालयात कलम १३८ एन. आय. ॲक्ट प्रमाणे फौजदारी प्रकरण दाखल केले होते.

उपरोक्त प्रकरणात मा. ६ वे प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी साहेब, बीड यांनी सखोल चौकशी केली असता, फिर्यादी बँके तर्फे दाखल केलेले साक्षी पूरावे व फिर्यादी बँके तर्फे करण्यात आलेला ॲड. अभिषेक एल. जोशी यांचा युक्तीवाद मा. न्यायालयाने ग्राह्य धरला व प्रकरणात आरोपी आशाबाई चौधरी यांना ३ महिने कारावास व रु.९०,०००/- नुकसान भरपाई देण्याचे आदेशीत केले.सदर प्रकरणात ॲड. अभिषेक एल. जोशी यांनी बँकेच्या वतीने काम पाहिले,



त्यांना ॲड. कपिल भैरट, ॲड. अक्षय कुलकर्णी व ॲड. शुभम शर्मा यांनी सहकार्य केले. तसेच बँकेच्या वतीने राहुल मुंगळे व उमेश टाक यांनी काम पाहिले.

(दि.२९-११-२०२३) या प्रकरणाची थोडक्यात हकीगत अशी आहे की, तांदळवाडी, ता. वाशी, जि. उस्मानाबाद येथील आशाबाई भ्र. अशोक चौधरी यांनी प्रियदर्शनी महिला नागरी सह. बँक लि. बीड यांचेकडून कर्ज घेतले होते. सदर कर्ज परतफेडीपोटी आरोपीने फिर्यादी बँकेस रु.९०,०००/- चा धनादेश दिला, परंतू सदर धनादेश न वटल्याने फिर्यादी बँकेने आरोपी विरुध्द बीड येथील मा. न्यायालयात कलम १३८ एन. आय. ॲक्ट प्रमाणे फौजदारी प्रकरण दाखल केले होते.

# अंगणवाडी ताईचे प्रामाणिक कर्तव्य; दोन महिन्याच्या बाळाला मांडीवर घेऊन काढले ९० आयुष्यमान कार्ड

नवनाथ आडे । गेवराई

कोरोना काळात आरोग्य विभागातील शिपायांपासून ते डॉक्टरांपर्यंत सर्वांनी जीव धोक्यात घालून काम केले. यात आशाताई, अंगणवाडी सेविकांचाही मोलाचा वाटा होता. आजही काही आशाताईंचे कर्तव्य कौतुकास पात्र आहे. पाटोदा तालुक्यातील तांबा राजुरी उपकेंद्रातील एका आशाताईने आपल्या दोन महिन्याच्या तान्हुल्याला मांडीवर घेत ९० लोकांचे आयुष्यमान भारत कार्ड काढले. त्यांच्या या प्रामाणिक कर्तव्याचे स्वागत होत आहे.

दुर्गा माने असे या आशाताईचे नाव आहे. सध्या आरोग्य विभागाकडून आयुष्यमान भारत



कार्ड काढण्याची मोहिम सुरू आहे. तसेच केवायसी करणे, सर्वेक्षण करणे आदी कार्यक्रमही घेतले जात आहेत. यात परिचारीका आणि आशाताईंचाही सहभाग आहे. याच आशाताई सध्या गावातील प्रत्येकाचे कार्ड काढण्यासाठी प्रयत्न करत आहेत. यासाठी त्यांचे कुटूंबाकडेही दुर्लक्ष होत आहे. असेच काहीसे उदाहरण तांबा राजुरीचे आहे.पाटोदा तालुक्यातील डोंगरकिन्ही आरोग्य केंद्रात अंतर्गत असलेल्या तांबा राजुरी आरोग्य उपकेंद्रात दुर्गा माने या कार्यरत आहेत. बुधवारी या आशाताईंनी आपल्या दोन महिन्याच्या बाळाला दिवसभर मांडीवर घेऊन ९० लोकांचे कार्ड काढले. त्यांच्या या प्रामाणिक सेवेचे आरोग्य विभागाकडून स्वागत होत आहे. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.उल्हास गंडाळ, सहायक जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.रौफ शेख, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.विकास आठवले, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ.एल.आर.तांदळे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ.नरेश कासट, वैद्यकीय अधिकारी डॉ.मयुर शिंदे, समुदाय आरोग्य अधिकारी सुभाष भारती, गट प्रवर्तक साधना शर्मा आदींनी माने यांच्या कर्तव्याचे स्वागत केले आहे.

# आजपासून बीडमध्ये रंगणार कलावंतांचा नाट्यसंग्राम

बीड : दि.३० नोव्हेंबर २०२३ - महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने दिनांक २० नोव्हेंबर पासून महाराष्ट्रभर वेगवेगळ्या केंद्रावर महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धेला सुरुवात झालेली आहे. यातच बीड केंद्रावर यशवंतराव चव्हाण नाट्यगृह येथे दिनांक ३० नोव्हेंबर २०२३ पासून महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धेला सुरुवात होत असून यामध्ये वेगवेगळ्या नाटकांच्या माध्यमातून कलावंतांचा नाट्यसंग्राम रंगणार आहे. अशी माहिती सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक बिभीषण चवरे यांनी दिली आहे. महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धा ही सांस्कृतिक कार्य मंत्री ना.सुधीर मुनगंटीवार व सांस्कृतिक कार्य विभागाचे प्रधान सचिव विकास खारगे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडणार आसल्याचे सांस्कृतिक कार्य संचालक बीभीषण चवरे यांनी सांगितले आहे.महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धेला सर्व नाटकांना बीडमधील जास्तीत जास्त नाट्य रसिकांनी उपस्थित राहून नाटकांचा आनंद घ्यावा असे आवाहन संचालक श्री चवरे यांनी केले आहे.सादर होणारी नाटकं१) जिवंत मुडदे २)गुलाल ३) चिरंजीव ४) मॅट्रिक ५)पाऊस अशी एकूण ५ नाटके दि.३० नोव्हेंबर २०२३ ते ४ डिसेंबर २०२३ या दरम्यान रोज सायं.७ वाजता यशवंतराव चव्हाण नाट्यगृह बीड येथे होणार आहेत.

# २६/११ अतिरिकी हल्यात शहीद जवान भारत मातेच्या सुपुत्रांस शेवगाव पोलीस स्टेशन व महाराष्ट्र पोलीस बॉईज संघटना तर्फे श्रध्दांजली वाहण्यात आली



प्रतिनिधी । गेवराई

शेवगाव पोलीस स्टेशन येथे महाराष्ट्र पोलीस बॉईज संघटनेतर्फे दि,२६ नोव्हेंबर रोजी मुंबई येथे आतंकवादी हल्यात शहीद जवान यांना श्रद्धांजली वाहुन शेवगाव पोलीस यांना गुलाबाचे फुल देऊन धन्यवाद मानले. या कार्यक्रमाला शेवगाव पोलीस स्टेशन चे पोलीस निरीक्षक विलास पुजारी साहेब यांनी परवानगी दिल्या बद्दल मनापासून धन्यवाद.शहिद झालेल्या सर्व वीर जवान यांना शेवगाव पोलीस स्टेशन चे सहाय्यक पोलीस निरीक्षक दिपक सरोदे सर यांच्या हस्ते हार घालून श्रध्दांजली वाहण्यात आली.व प्रत्येक पोलीस अधिकारी यांना गुलाबाचे फुल देऊन धन्यवाद मानले कार्यक्रमाला उपस्थित सहाय्यक पोलीस निरीक्षक दिपक सरोदे सर, पोलीस सब इन्स्पेक्टर अमोल पवार सर, व सर्व पोलीस अधिकारी ठाणे अंमलदार कर्मचारी महाराष्ट्र पोलीस बॉईज संघटनेचे शेवगाव तालुका अध्यक्ष दिपक मोहिते सर, महाराष्ट्र पोलीस बॉईज संघटना शेवगाव तालुका प्रमुख विकास शेलार व सर महाराष्ट्र पोलीस बॉईज संघटना शेवगाव तालुका सचिव मधुकर मोहिते सर महाराष्ट्र पोलीस बॉईज संघटनेचे नवनिर्माण पदाधिकारी राक्षी शाखा प्रमुख दिलीप जगधने सर उपस्थित होते शेवगाव पोलीस स्टेशन चे सहाय्यक पोलीस निरीक्षक दिपक सरोदे सर यांच्या हस्ते महाराष्ट्र पोलीस बॉईज संघटना राक्षी शाखा प्रमुख दिलीप श्रीधर जगधने यांना नियुक्ती देण्यात आली व संघटनेच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

# अवकाळी पावसाचे संकट

मुंबई : २६ ते २८ नोव्हेंबरदरम्यान अवकाळी पाऊस, गारपीट यामुळे राज्यातील २२ जिल्ह्यांना फटका बसला आहे. कृषी विभागाच्या अहवालानुसार, ३ लाख ९३ हजार ३२५ हेक्टरवरील पिके, फळबागांचे नुकसान झाले. बुधवारी राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीतही याविषयी चर्चा करण्यात आली. महसूल, कृषी विभागाने तातडीने एकत्रित पंचनामे करावेत, ३३ टक्क्यांपेक्षा जास्त शेतीपिकांचे नुकसान झालेल्या प्रकरणात निधी मागणीचा प्रस्तावही तत्काळ पाठवावा, अशा सूचना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सर्व जिल्हाधिकाऱ्यांना दिल्या आहेत. नवीन नियमानुसार शेतकऱ्यांना ३ हेक्टरपर्यंतच्या नुकसानीची सरकार भरपाई देईल, अशी ग्वाहीही त्यांनी दिली.

तसेच सर्व पालकमंत्र्यांनी जिल्ह्यात जाऊन नुकसानीचा आढावा घ्यावा, अशा सूचना दिल्या. दरम्यान, बुधवारी सलग चौथ्या दिवशी मराठवाड्यातील काही भागांना पाऊस व गारपिटीचा तडाखा बसला. नांदेड जिल्ह्यातील भोकर, नायगाव, हदगाव, मुदखेड तर परभणी जिल्ह्यातील सोनपेठ तालुक्यात गारांसह पाऊस झाला. लोहा तालुक्यातील ४ मंडळांत अतिवृष्टी झाली. धाराशिव जिल्ह्यात बुधवारी १२.८ मिमी पाऊस पडला.या जिल्ह्यातील ८४ गावांतील १९२६ हेक्टरवरील पीकांचे नुकसान झाले.



सर्वाधिक नुकसान विदर्भ, मराठवाडा, नाशकात
यवतमाळ १,२६,४३८ हेक्टर
बुलडाणा ६३,२५० हेक्टर
हिंगोली ७९,४०२ हेक्टर
संभाजीनगर ४५,७८३ हेक्टर
नाशिक ३३,३८८ हेक्टर
नगर १५,३०७ हेक्टर
जालना १३,०४९ हेक्टर
अकोला ६,८२१ हेक्टर

ओल्या दुष्काळात राजकारणाचा 'सुकाळ' : सर्व पालकमंत्री करणार राज्यभर दौरे; काँग्रेस नेते ३४ जिल्ह्यांची करणार पाहणी; राष्ट्रवादीचे तीन जिल्ह्यांत आक्रोश मोर्चे

मुंबई । अवकाळी पावसामुळे राज्यात ओल्या दुष्काळासारखी परिस्थिती निर्माण झाली आहे. या नैसर्गिक संकटाने शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. दुसरीकडे, सर्वपक्षीय नेत्यांकडून मात्र राजकीय कुरघोडी करण्यासाठी नुकसानग्रस्त भागात 'पर्यटना'चे नियोजन करण्यात आले आहे.

## अवकाळी मुळे जिंतूर तालुक्यातील शेतकऱ्यांचे व व्यापाऱ्यांचे भारी नुकसान

प्रतिनिधी जिंतुर

जिंतूर : शिवसेना तालुकाप्रमुख ड सुनिल बुधवंत यांनी केली दोन दिवसीय पाहणी रविवारच्या (२६ नोव्हेंबर) मध्यरात्री पडलेल्या अवकाळी पावसाचा फटका जिंतूर तालुक्यातील बहुतांश भागाला बसला आहे. या पावसामुळे शेतीपिकांचं नुकसान झालं आहे. झालेल्या नुकसानीची पाहणी शिवसेना तालुकाप्रमुख ड. सुनिल बुधवंत यांनी सोमवार (२७ नोव्हेंबर) व मंगळवार (२८ नोव्हेंबर) या दोन दिवसात केली.

जिंतूर तालुक्यात रविवारच्या मध्यरात्रीपासूनच मेघगर्जनेसह मुसळधार पाऊस झाला, त्यामुळे कापूस पीक भिजलं असून तूर, हरभरा भाजीपाला ही पिकं भूईसपाट झाली आहेत. अतिपावसामुळे शेतातील कापसाची बोंडं खाली गळून पडली आहेत, वेचणीला आलेल्या कापसाची पावसामुळे दाणादाण उडाली आहे. रब्बी हंगामातील ज्वारी, गहू पिकांनाही पावसाचा फटका बसला आहे. त्याचबरोबर वीज पडून पशुधनाचं सुद्धा नुकसान झालं आहे.

तालुक्यातील कर्परा नदीला आलेल्या पुरामुळे पुराचे पाणी तालुक्यातील अनेक गावांमध्ये शिरलं आहे. तसेच इतर नदी नाल्यांना आलेल्या पुरामुळे शहरात सुद्धा पाणी जमा झाले होते. लोकांच्या घरात तसेच



व्यापाऱ्यांच्या दुकानात सुद्धा पाणी शिरल्याने वस्तूंचे तथा मालाचे नुकसान झाले आहे.झालेल्या नुकसानीचा आढावा शासन तथा प्रशासनाकडे पोहोचवून देऊ जेणेकरून महाराष्ट्राचे संवेदनशील मुख्यमंत्री मा. एकनाथ शिंदे साहेब लवकरच मदत करतील असा विश्वास ड. बुधवंत यांनी व्यक्त केला.

## गुटखा प्रकरणातील फरार गुटखा माफिया केज पौलिसांनी मुसक्या आवळल्या

### पोलिसांना चकमा देणार गुटखा किंग आबा ; आता पंकज कुमावत यांच्या ताब्यात

प्रतिनिधी केज

गुटखा प्रकरणातील फरार आरोपी गुटखा माफिया महारुद्र उर्फ आबा मुळे हा अनेक दिवसा पासून पोलिसांना गुंगारा देत होता. तो केज मध्ये आला असल्याची माहिती मिळताच अप्पर पोलीस अधीक्षक पंकज कुमावत यांच्या मार्गदर्शनाखाली केज पोलिसांनी अखेर त्याच्या मुसक्या आवळल्या.

बीड येथील बेकायदेशीर गुटखा आणि विविध गंभीर गुन्ह्यातील फरार आरोपी महारुद्र उर्फ आबा मुळे हा दि. २७ नोव्हेंबर रोजी केज येथे आला असल्याची माहिती एका गुप्त खबऱ्या मार्फत अप्पर पोलीस अधीक्षक पंकज कुमावत यांना मिळाली. माहिती मिळताच त्यांनी पोलीस निरीक्षक बाळासाहेब पवार आणि पोलीस निरीक्षक राजेश पाटील यांना माहिती देऊन कारवाईचे आदेश दिले. आदेश मिळताच पोलीस उपनिरीक्षक राजेश पाटील, पोलीस अंमलदार शमीम पाशा, त्रिंबक सोपने व महिला पोलीस पुजा माके हे केज येथील शासकीय विश्राम गुहा जवळ दबा धरून बसले. गुटखा माफिया महारुद्र उर्फ आबा मुळे हा पोलिसांना पहाताच पळून जात असताना पोलीस उपनिरीक्षक राजेश पाटील, पोलीस नाईक शमीम पाशा, त्रिंबक सोपने व महिला पोलीस पुजा माके यांनी पाठलाग करून त्याच्या मुसक्या आवळल्या.गुटखा माफिया महारुद्र उर्फ आबा मुळे याच्यावर दिंद्रुड येथे गु.र.नं. २०५/२०२३, सिरसाळा येथे गु र नं २२१/२०२३ २२२/२०२३, नेकनुर गु.र.नं. २८०/२०२३ आणि २८९/२०२३, धारूर गु.र.नं. ३०४/२०२३ या गुन्हयात गुन्हे दाखल आहेत तसेच तो बीड जिल्ह्यातील विविध पोलीस स्टेशन मधील गंभीर गुन्ह्यातील फरार आरोपी होता ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकुर, यांचे मार्गदर्शनाखाली अपर पोलीस अधिक्षक पंकज कुमावत यांचे आदेशाने पोलीस उपनिरीक्षक राजेश पाटील, पोलीस अंमलदार शमीम पाशा, त्रिंबक सोपने, पुजा माके यांच्या पथकाने ही कारवाई केली.



# यशाचा मृतदेह शोधण्यात जिल्हाप्रशासन यश

पाटोदा : प्रतिनिधी

जिल्ह्यातील मिनी महाबळेश्वर असलेल्या पाटोदा तालुक्यातील सौताडा धबधब्या पाहणीसाठी गेलेल्या बीडमधील तरूण मित्रांसोबत पोहताना दोन दिवसा पूर्वी धबधब्यात बुडाला होता . यानंतर गावातील नागरिकांसह पोलीस आणि वन विभागाच्या कर्मचाऱ्यांकडून शोध मोहिम करण्यात आली मात्र तीसला दिवस उजडला असतांनाही यश राठोडचा मृतदेह शोधण्यात जिल्हा प्रशासनाला यश येत नव्हते. याची कल्पना आमदार रोहित पवार व आमदार बाळासाहेब आजबे यांना दिल्यानंतर त्यांनी पुणे येथील रेस्क्यू टीम यांना प्रचारण केले या टीमने बुधवारी सकाळी मृतदेह धबधबा खाली शोधण्यास सुरुवात केली अवघ्या काही मिनिटांमध्ये पुण्यातील रेस्क्यू टीमने हा मृतदेह शोधला मृतदेह सापडतात नातेवाईकांनी टाहो फोडला यावेळी प्रशासनाच्या वतीने तहसीलदार बीजे चितळे पोलीस निरीक्षक पाटील पोलीस हेडकॉन्स्टेबल केशव तांदळे पोलीस हेडकॉन्स्टेबल उबाळे पोलीस उप निरीक्षक कोळेकर साहेब पोलीस उपनिरीक्षक पतंगे साहेब तलाठी शिंदे आदी प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते

टाक्रवण तांडा येथील यश गुलाब चव्हाण (वय २१ वर्षे) बीड येथील कॉलेजमध्ये शिक्षण घेणारा विद्यार्थी आपल्या मित्रासोबत पर्यटक असलेल्या सौताडा येथील धबधबा पाहण्यासाठी आणि दर्शनासाठी गेले असतां त्याठिकाणी असलेल्या पाण्यात उडी मारून पोहण्याचा आनंद घेत होते. मात्र अचानक पोहतांना यश चव्हाण पाण्यात बुडाला. यावेळी उपस्थित नागरिकांकडून शोधण्याचा प्रयत्न केला परंतू यश मिळाले नसल्याने मित्रांणी पाटोदा ठाण्यात धाव घेत झालेली घटना सांगितली. त्यानंतर पोलीसांकडून सोमावारी सांयकाळी भेट देत शोध मोहिम करण्यात आली परंतू सोमवारीही यशचा मृतदेह सापडला नाही. त्यानंतर मंगळवारी सकाळ पासून पोलीस प्रशासन, वन विभाग आणि ग्रामस्थ व नातेवाईकांकडून दिवसभर आणि रात्र दहा वाजेपर्यंत



शोधमोहीम करूनही यशचा मृतदेह सापडला नसल्याने नातेवाईकांकडून जिल्हा प्रशासनाच्या विरोधात संपात व्यक्त करण्यात आला. यश चव्हाणचा मृतदेह बुडून तीन दिवस उजाडले असतांनाही जिल्हा प्रशासन गंभीर दखल घेत नसल्याने नातेवाईकांकडून संताप व्यक्त केला जात आहे. यशचे मृतदेह शोधण्यासाठी इतर टीम बोलविण्याची मागणी नातेवाईक यांनी केली होती . यावेळी जामखेड मतदार संघाचे आमदार रोहित दादा पवार आमदार बाळासाहेब आजबे काका यांनी पुणे येथील रेस्क्यू टीमला सहकार्य करण्यास विनंती केली . यावेळी ही टीम सौताडा येथे दाखल होऊन बुधवारी सकाळी साडेअकराच्या दरम्यान हे प्रेत सापडले यावेळी पाटोदा पोलीस आय पाटील साहेब तहसील कार्यालयचे तहसीलदार बीजी चितळे तलाठी शिंदे साहेब ग्रामपंचायतचे ग्रामसेवक सरपंच सौताडा गावातील सामाजिक कार्यकर्ते आदी ग्रामस्थ यावेळी उपस्थित होते

# ७/१२ आमच्या बापाचा, बांधावर येऊ नका

## भुजबळांना स्वतःच्या मतदारसंघातील दौऱ्याला मराठा समाजाचा विरोध, ऑडिओ क्लिप व्हायरल



राज्यात गेल्या काही दिवसांमध्ये अवकाळी पावसाने हजेरी लावली आहे. यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झालं आहे. मंत्री छगन भुजबळ आज नुकसानग्रस्त भागाचा दौरा करणार आहेत. मात्र, त्यांच्या दौऱ्याला येवला मतदारसंघातून मोठी विरोध पहायला मिळत आहे. छगन भुजबळ यांच्या या दौऱ्याला मराठा समाजाने विरोध केल्याची माहिती समोर आली आहे. त्यांच्या दौऱ्याला विरोध करणारे एक ऑडिओ क्लिप देखील व्हायरल झाली आहे.

'आम्ही नुकसान सोसू पण तुम्ही बांधावर येऊ नका', असं गावकऱ्यांनी म्हटलं आहे. शासन दरबारी भांडून आम्हाला निधी उपलब्ध करुन द्या, मात्र, आमच्या बांधावर येण्याचा अट्टाहास का? असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला आहे. यासह सोमठानदेश गावात भुजबळ गो बॅकच्या घोषणाही देण्यात आल्या आहेत. भुजबळ यांच्या दौऱ्याला विरोध करणारे व्हिडीओ देखील सोशल मीडियावरती व्हायरल होताना दिसत आहेत.

छगन भुजबळ यांना त्यांच्याच येवला मतदारसंघातुन विरोध होताना दिसत आहे. छगन भुजबळ गारपीटग्रस्त भागाचा दौरा करणार आहेत. दौऱ्याला विरोध करणारी एक ऑडिओ क्लिप देखील व्हायरल झाली आहे. या ऑडिओ क्लिपमध्ये 'मला कोणी गावबंदी करू शकत नाही, मी कुणाला घाबरत नाही' असं भुजबळ म्हणाले आहेत.

■ ग्रामस्थ: सोमठाणे देश मधून बोलत आहे, तिथे तुमचा दौरा आहे, सकल मराठा समाजाच्यावतीने भुजबळ साहेब तुम्हाला हात जोडून विनंती करतो येऊ नका, आमच्या गावच्या बांधावर येऊ नका....

छगन भुजबळ: ठिक आहे, बघू काय करायचे ते? ग्रामस्थ : तुम्ही आले तर वातावरण खराब होऊन जाईल. सर्व गावकऱ्यांची विनंती आहे तुम्ही येऊ नये. छगन भुजबळ: बरं.बरं... ग्रामस्थ : जमीनीचा ७/१२ आमच्या बापाचा आहे. तुम्हाला व्हिडीओ पाठवला आहे तो बघून घ्या, हात जोडून विनंती आहे येऊ नका. छगन भुजबळ: असं आहे, मला कोणी म्हटलं या तर मी जाईल, नाही म्हटलं तर बघू... ग्रामस्थ : आमच्या गावचा ठराव झाला आहे. कोणालाही गावात येऊ द्यायचे नाही त्यामुळे तुम्ही येऊ नका.. छगन भुजबळ: तुम्ही चार लोक म्हणजे ठराव होतो का?


हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT